नियमीत फौजदारी खटला क्रमांक ६११/२०१७
शासन विरुध्द नौशाद अन्सारी
कलम ३२४, ३२३ भादंसं
निशाणी क्रमांक १९

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करते की,

माझे नावः- अमित रामचंद्र खुटवड
वयः- ३६ वर्षे धंदाः- सहा. पोलीस निरीक्षक
रा. गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई

सरतपासणीसाठी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. सदर घटना दिनांक ०७/०६/२०१७ रोजी घडली. त्या कालावधीत मी वरळी पोलीस ठाण्यात पोलीस उप निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मी दिवसपाळी ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यावर होतो. सायंकाळी फिर्यादी मनोज मोहतो हा जखमी अवस्थेत पोलीस ठाण्यात आला. त्याने त्याच्या ओळखीच्या नौशाद अन्सारी याने त्याला रॉडने मारहाण करुन जखमी केल्याचे सांगितले. त्यानंतर मी फिर्यादीला उपचारासाठी पोदार रुग्णालयात पाठवले. त्यानंतर उपचार घेवुन आल्यावर फिर्यादीची तक्रार नोंदवुन घेतली. निशाणी क्रमांक १० वरिल तक्रार आता मला दाखवण्यात आली, त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

२. त्यानंतर पंचासह घटनास्थळी गेलो. त्याठिकाणाहुन लोखंडी रॉड/ पट्टी जप्त केली. त्याबाबत पंचनामा तयार केला. तो पंचनामा आता मला दाखवण्यात आला, त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो पंचनामा निशाणी क्रमांक २० वर आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले.

३. त्यानंतर मी आरोपीला अटक केली. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे.

५. घटनास्थळावरुन जप्त केलेला रॉड पाहिल्यास मी ओळखु शकेन.

सरतपास पुर्ण.

उलट तपास आरोपीसाठी वकील श्री. निकाळजे यांच्याकडुन

६. हे म्हणणे खरे आहे की, जांभोरी मैदानामध्ये ललित कला भवन आहे. हे मला माहित नाही की, त्याठिकाणी संकल्प प्रतिष्ठानचा दाताचा दवाखाना आहे. मी वरळी पोलीस ठाण्यात पाउणे चार वर्षे नेमणुकीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, जांभोरी मैदानात मुलं खेळायला येतात. हे म्हणणे खरे आहे की, बाजुला इमारत क्रमांक ३२ असुन ती रहिवाशी वापरात आहे. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी लोक तिथे फिरण्यासाठी येतात. हे मला माहित नाही की,

त्या मैदानाच्या कोप-यावर शिवण क्लास आहे. हे मला माहित नाही की, वाहन चालवण्यास शिकवण्याचे कार्यालय देखील तिथे आहे किंवा कसे.

७. मी फिर्यादीचे रक्ताने माखलेले कपडे जप्त केले नव्हते. मी तिथे राहणा-या व्यक्तीचे जबाब नोंदवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी कामगार कल्याण मंडळाचा सुरक्षारक्षक तिथे असतो. हे मला माहित नाही की, आरोग्यधाम व्यायाम शाळा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मैदानाच्या कोप-यावर लहान मुलांची खेळणे, झोका, पाळणा वगैरे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिथे अंबादेवीचे मंदीर आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने खोटया मजकुराची तक्रार दिली. हे म्हणणे खरे आहे की, तपासादरम्यान असे निष्पन्न झाले होते की, दुकान मालक ते दुकान आरोपीला भाडयाने देणार होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला रॉडने मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी पाय घसरुन पडला, आरोपीला ते दुकान मिळणार असल्याने त्याने खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे खोटे जबाब नोंदवले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी मी आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देतो.
उलट तपास पुर्ण.
फेर तपास काही नाही..

दिनांक २७/०९/२०२४ समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
६२वे न्यायालय, दादर, मुंबई